Vidya Prathishthan's
Bhor English Medium School, Bhor
Inward No. 198
Date 27/08/2009



इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
शासन निर्णय क्र:-संकिर्ण -१९०९/प्र.क्र.१९७/०९/प्राशि-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२, दिनांक २६ ऑगस्ट, २००९.

पहा:-१) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नमाशा२००८/(४१८/०८)/माशि-१, दि.२९ एप्रिल २००८ व दि.१४ मे, २००८
२) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नमाशा२००८/(५४६/०८)/माशि-१, दि.३ जुलै, २००८

**शासन निर्णय:-** शासन परिपत्रक दि.२९ एप्रिल २००८ अन्वये राज्यात कायम विनाअनुदान तत्वावर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्याकरिता खाजगी शैक्षणिक संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळा सुरु करण्याबाबत प्राप्त प्रस्तावांपैकी ज्या प्रस्तावांवर जिल्हा समिती व राज्य समिती, या दोन्ही समितीच्या शिफारशी आहेत अथवा यापैकी एका समितीची शिफारस आहे अशा इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांना सन २००९-१० पासून इयत्ता पहिलीच्या वर्गास (फक्त एका तुकडीस ) कायम विनाअनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

२. विद्या प्रतिष्ठान ,विद्यानगरी , भिगवण रोड , ता. बारामती पुणे या संस्थेच्या . विद्या प्रतिष्ठाणचे भोर इंग्लीश मिडीयम स्कुल भोलावडे ता. भोर जि. पुणे या शाळेच्या प्रस्तावाची मुख्य कार्यकारी अधिकारी ; जिल्हा परिषद , पुणे यांनी फेरतपासणी करुन अनुकूल शिफारस केली आहे. त्यानुसार विद्या प्रतिष्ठान ,विद्यानगरी , भिगवण रोड , ता. बारामती पुणे या संस्थेच्या विद्या प्रतिष्ठाणचे भोर इंग्लीश मिडीयम स्कुल भोलावडे ता. भोर जि. पुणे या शाळेस परवानगी देण्याबाबत मा. मंत्रीमंडळ उपसमितीने मान्यता दिलेली असल्याने सन २००९-१० पासून इयत्ता पहिलीच्या वर्गास (फक्त एका तुकडीस.) कायम विनाअनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या या शाळेला कोणत्याही स्वरुपाचे अनुदान शासनाकडून देय असणार नाही.

४. शासन निर्णय दिनांक १९ ऑक्टोबर २००७ मधील तरतुदीनुसार सदर शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेली सदर शाळा अठरा महिन्याच्या आत सुरु करणे बंधनकारक राहील. अन्यथा या शाळेच्या परवानगीचे आदेश रद्द झाले आहेत, असे गृहीत धरले जाईल.

५. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या सदर शाळेस शासनाच्या सर्व संबंधित कायदे व नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

G:\Ps-3\New PERMISSION/GR-PS-EEnglish .lwp

CamScanner

६. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www/manharashtra.gov.in) उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ना.ऊ. रौसल )
उप सचिव महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. मुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा. मंत्री शालेय शिक्षण, यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री शालेय शिक्षण, यांचे खाजगी सचिव,
मा. सचिव, (शालेय शिक्षण व क्रीडा), यांचे स्वीय सहाय्यक
शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, राज्यशैक्षणिक संशाधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),पुणे
मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई



CamScanner

महाराष्ट्र शासन

<u>शासन परवानगी आदेश</u>

क्रमांक- इंमाशा -२०११/(८३/११)/माशि-१,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२,
दिनांक:- १५/९/२०११.

Vidya Prathishthan's
Bhor English Medium School, Bhor
Inward No. 364
Date 28/09/11

प्रति,

अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
शिवाजीनगर, पुणे.

विषय :- इंग्रजी माध्यमाच्या इ. ७ वीपर्यंत सुरु असलेल्या प्राथमिक शाळेस जोडून इ. ८ वी ते इ. १० वी चे इंग्रजी माध्यमाचे वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :- १) शासन निर्णय, क्र. नमाशा २०१०/(९६/२०१०) /माशि-१, दि.१०.३.२०१०.
२) संस्थेचा दि.२१/७/२०११ रोजीचा अर्ज व सर्व संबंधित कागदपत्रे.

सोबत जोडलेल्या संस्थेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की <u>विद्या प्रतिष्ठान, विद्यानगरी, भिगवण रोड, बारामती, जि.पुणे</u> या संस्थेद्वारे संचलित इंग्रजी माध्यमाच्या इ. ७ वीपर्यंत सुरु असलेल्या भोर इंग्लिश मिडीयम स्कूल, भोर-पुणे रोड, भोलावडे, ता.भोर, जि.पुणे येथील प्राथमिक शाळेस जोडून इंग्रजी माध्यमाचे इ. ८ वी ते इ. १० वीचे वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास शासन स्तरावरुन पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे :-

१) परवानगी आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत संस्थेने राज्यमंडळाकडे संलग्नता प्रमाणपत्रा करिता (प्रथम प्रोव्हीजनल व नंतर रेग्युलर) अर्ज करणे आवश्यक राहील.
२) सदर परवानगी आदेश राज्य मंडळातर्फे दिल्या जाणाऱ्या संलग्नता प्रमाणपत्राकरिता (रेग्युलर ॲफीलीएशन) आवश्यक असणाऱ्या सर्व निकषांची पूर्तता करण्याच्या अधीन राहतील.
३) राज्य मंडळाने संलग्नता प्रमाणपत्राकरिता(रेग्युलर ॲफीलीएशन)निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता न केल्यास सदर परवानगी आदेश रद्द समजण्यात येतील.
४) परवानगी दिलेल्या ठिकाणावरुन सदर शाळेचे स्थलांतर करण्यास परवानगी दिली जाणार नाही.
५) संबंधित शाळेने शासन, शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे व राज्य मंडळ यांच्यातर्फे निर्गमित केल्या जाणाऱ्या सर्व आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.
६) परवानगी देण्यात आलेल्या इ. ८ ते १० वीच्या वर्गांमध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम शिकविणे आवश्यक राहील.
७) परवानगी आदेशाच्यावेळी शाळेत सुरु असलेल्या सर्व वर्गांना या आदेशाद्वारे परवानगी देण्यात येत आहे.

(रा. चं. पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी-
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे
मा.मंत्री (शाशि) यांचे खाजगी सचिव /मा.राज्यमंत्री (शाशि) यांचे खाजगी सचिव
विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे / शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.पुणे
सचिव, <u>विद्या प्रतिष्ठान, विद्यानगरी, भिगवण रोड, बारामती, जि.पुणे</u>
निवड नस्ती, माशि-१



E:\Shinde Folder-2New Eng.form.lwp

CamScanner